# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट ३७८-२०२४ दिनांक :- १०/१०/२०२४

## "तडीपार आदेशाचा भंग करुन मनाई असलेल्या परीसरात वावरणा-या तडीपार आरोपीतास पकडण्यात गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांना यश

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये तडीपार करण्यात आलेले आरोपीत हे मनाई आदेशाचा भंग करुन त्यांचे परीसरात वास्तव्य करीत असल्याने अशा तडीपार इसमांचा शोध घेवून त्यांचेवर कारवाई करण्याबाबत मा. वरीष्ठांनी आदेशित केले होते. त्या अनुषंगाने दिनांक ०९/१०/२०२४ रोजी तुळींज पोलीस ठाण्याच्या अधिकारक्षेत्रात गुन्हेगारांवर वॉच पेट्रोलींग फिरत असताना आरोपीत रीझवान ईमामुद्दिन खान वय २९ वर्ष रा. नालासोपारा पुर्व, ता. वसई यास मा. पोलीस उप आयुक्त सो, परि-२ यांचे कार्यालय आदेश जा.क्र. पो.उ.आ/परि-२/रीजवान खान-आदेशक्र १३/१८४०/२०२४ दिनांक ३१/०५/२०२४ या आदेशा प्रमाणे पालघर, ठाणे जिल्हा, नाशिक, मुंबई उपनगर जिल्हा कार्यक्षेत्रातुन ०२ वर्षा करीता तडीपार करण्यात आले असतानाही तो दिनांक ०९/१०/२०२४ रोजी १६.१० वा चे सुमारास सितारा बेकरीचे समोर, नालासोपारा पुर्व, ता. वसई येथे येथे मिळुन आला.

नमुद तडीपार इसम रीझवान ईमामुद्दिन खान वय २९ वर्ष रा. नालासोपारा पुर्व, ता. वसई याने मा. पोलीस उप आयुक्त सो, परि-२ यांचे कार्यालयाचे आदेश पारीत २ वर्ष तडीपार आदेशाचे उल्लंघन केल्याने त्यास तुळींज पोलीस ठाण्यात जमा करुन त्याचे विरोधात तुळींज पो.स्टे. गु.रजी.नं. ७१३/२०२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे अन्वये गुन्हा नोंद करुन कारवाई करण्यात आली आहे.

तडीपार आदेशाचा भंग करणा-या आरोपीताचे नाव :-

रीझवान ईमामुद्दिन खान वय २९ वर्ष रा. रुम नं ४०१, शमा अपार्टमेंट, अंन्सारनगर मशिद, लक्ष्मीनगर, नालासोपारा पुर्व, ता. वसई

सदरची कामगिरी मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, पोहवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/१२०४७ दादा आडके, पोहवा/१२०५३ सुधीर नरळे, पोशि/२३९४२ प्रतिक गोडगे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे.

----0000----